स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव
॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव
Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon
'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# जनसंपर्क विभाग

जळगाव : दि. २५ (प्रतिनिधी) रासायनिक , जैविक किंवा अणुयुद्धाच्या काळात ओढावलेल्या आपत्तींच्या काळात उद्भ्रणा-या प्रसंगाना कसे सामोरे जायचे याची शास्त्रशुध्द माहिती रासेयो स्वयंसेवकांना एनडीआरएफच्या प्रशिक्षकांनी दिली.

कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सुरू असलेल्या राज्यस्तरीय आपत्ती व्यवस्थापनाच्या शिबिरात आज रविवारी म्हणजे सातव्या दिवशी सीबीआरएन इमरजन्सी विषयक माहिती दिली. जैविक आणुयुद्धाच्या काळात स्वयंसेवक म्हणून कोणत्या प्रकारचे काम करून आपण सामाजिकदायित्व निभावू शकतो याबद्दलची माहिती प्रशिक्षकांनी विद्यापीठात सुरू असलेल्या पाच विविध सभागृहांमध्ये देण्यात आली.

इन्स्पेक्टर अनंता बाभूळकर, रामकृष्ण शेळके, गणेश देशमुख, देविदास गीते, वैभव राऊत, शरद भागवत, सुशांत सेठ, विजय म्हस्के, लालचंद भोसले, अभय आवळे, विकास राऊत, योगेश थोरात, अभिजीत खूपसे, श्याम मोरे, सर्वेश उपाध्याय, वैभव शेडोळे, जायभाये या प्रशिक्षकांनी प्रात्यक्षिकासह माहिती दिली.

उद्या सोमवार दि.२६ डिसेंबर रोजी रासेयो स्वयंसेवकांची शोभायात्रा निघणार आहे.विद्यापीठाच्या मुख्य प्रवेशद्वाराजवळ सकाळी नऊ वाजता कुलगुरू प्रा. व्ही. एल. माहेश्वरी हे झेंडी दाखवून शोभायात्रा सुरू करतील. स्वातंत्र्याचा सुवर्ण महोत्सव ही थिम देण्यात आली आहे. मुख्य प्रशासकीय इमारतीजवळ शोभायात्रेचा समारोप होईल. त्यानंतर दुपारी प्रशिक्षणाचे वर्ग होतील. अशी माहिती रासेयो संचालक प्रा. सचिन नांद्रे व समन्वयक प्रा. किशोर पवार यांनी दिली.

.........................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२२ दिनांक: २५ डिसेंबर, २०२२

प्रति,
मा.संपादक/प्रतिनिधी,
महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी